# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०१५ / फाल्गुन २६, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूंकप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७६**

---

### राज्यातील कृषि विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना आश्वासित प्रगत योजना लागू करण्याबाबत

**(१) * २८७२ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना आश्वासित प्रगत योजना (वेतन श्रेणी व निवड श्रेणी) लागू झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य विद्यापीठातील प्राध्यापकांना ही योजना लागू आहे काय,

(३) असल्यास, कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांवर होणारा अन्याय शासन केव्हा दूर करणार आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात सन २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे बेघर झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२) * ३४३५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात सन २००५ च्या अतिवृष्टीत २४ गावे बेघर झाली असून अनेक वेळा पाहणी, दौरे करुन या गावांचे माहे डिसेंबर, २०१४ अखेर पुनर्वसन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर गावांचे तातडीने पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) सुधारीत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(३) मौजा.भिमकुंड, मौजा सावंगी ता.घाटंजी या दोन गावाचे सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त आहेत. उर्वरित गावाचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याच्या कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रस्तावामध्ये मोजणीबाबत हद्द कायम करणे तसेच अभिन्यास तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

-----------------

**रेडीरेकनर व स्टॅम्प डयुटीचे वाढलेले दर कमी करण्याबाबत**

**(३) * ३८१८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-२०१५ सालासाठी रेडीरेकनर व स्टॅम्प ड्युटीच्या दरात १४ ते १८ टक्के वाढ करण्यात आलेली असून ही दरवाढ करतांना कोणत्याही शास्त्रशुध्द निकषांचा विचार केला गेलेला नाही किंवा स्वतंत्र नियामक आयोग नेमण्यात आलेला नाही. नविन भुमापन कायद्यामुळे शासकीय प्रकल्पांसाठी लागणाऱ्या जागांचेही दर वाढणार असून त्याचा फटका शासकीय प्रकल्पानांही बसणार आहे, असे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास रेडीरेकनर आणि स्टॅम्प ड्युटीत वाढ केल्याने राज्यातील सर्व स्तरातून नाराजी व्यक्त करण्यात येत असून रेडीरेकनरचे दर ठरवितांना शासनाने कोणते निकष विचारात घेतले आहेत,

(३) असल्यास, रेडीरेकनर आणि स्टॅम्प ड्युटीचे दर कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) राज्यातील सन २०१५ साठी वार्षिक मूल्यदर तक्त्यातील सर्वसाधारणपणे सरासरी वाढ १४ % असून ती मर्यादित स्वरुपात असून काही क्षेत्रात सन २०१४ चे दर सन २०१५ करीता कायम ठेवण्यात आलेले आहेत. मुद्रांक शुल्क हे कर आकारणीशी संबंधित असल्याने नियामक आयोगाची आवश्यकता नाही. भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनंसार जमिनीचा मोबदला निश्चित करण्याची कार्यवाही करणे कायद्याने बंधनकारक आहे.

वार्षिक मूल्यदार तक्ते हे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व मुंबई मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम १९९५ मधील तरतूदी, कार्यपध्दती तसेच नोंदणीकृत खरेदी विक्री व्यवहारातील दर, व्यवहारांची संख्या, वास्तु प्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशीतील दर इ. आधारे तयार केले जातात. वार्षिक मूल्यदार तक्त्यांचे प्रस्तावावर, जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली मा.लोकप्रतिधी यांचे समवेत बैठक आयोजित करुन चर्चा केली जाते त्यानंतर प्रती वर्षी दि. ०१ जानेवारी रोजी निर्गमित करण्यात येतात.

(३) सन २०१५ चे वार्षिक मूल्यदर तक्ते दि. ०१ जानेवारी, २०१५ पासून अंमलात आले असून, वार्षिक मूल्यदर तक्ते अंमलात आलेनंतर त्यामधील दर कमी करणेबाबत नियमात तरतूद नाही. तथापि, वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दर मान्य नसल्यास, दस्त नोंदविणेकामी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३१ अनवये अभिनिर्णयाकरीता अर्ज करुन सुधारित दर निश्चित करुन घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात वाढलेले विजचे दर कमी करण्याबाबत**

**(४) * ४१२७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हिवाळी अधिवेशनाच्या सुरूवातीस वीजदरातील सबसिडी किमान पुढे ३ महिने म्हणजे माहे, जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत सुरु ठेवू, असे जाहिर आश्वासन दिले असतानाही प्रत्यक्षात केवळ माहे नोव्हेंबर, २०१४ या एकाच महिन्यात अनुदान दिले गेले परंतू पुढील दोन महिन्यांबाबत अद्यापही कोणताही निर्णय झाला नसल्याने वीज ग्राहकांना माहे डिसेंबर, २०१४ ची देयके जानेवारीमध्ये वाढीव दराने आल्यामुळे ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे माहे, जानेवारी, २०१४ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वाढलेले वीजदर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) वीज कायदा २००३ नुसार सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार वीज नियामक आयोगास असून आयोगाने जानेवारी २०१५ अन्वये निर्धारीत केलेल्या दराने वीज देयकांची आकारणी करण्यात येत आहे. राज्यातील औद्योगिक ग्राहकांची नोव्हेंबर २०१४ च्या वीज वापराची बिले एका महिन्यांपुर्ती सवलतीच्या दरात देण्यात आली. तसेच कृषी ग्रांहकांची वीज दरातील सवलत पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना तात्काळ कनेक्शन देणेबाबत**

**(५) * ४०६१ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नविन कृषीपंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुन सुध्दा अद्यापपर्यंत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, खामगांव यांनी नविन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत जोडण्या न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना कृषिपंपाची जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे. खामगांव विभाग अंतर्गत पैशाचा भरणा करुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सन २०१२-१३ मध्ये २३१३, २०१३-१४ मध्ये २३५७ व २०१४-१५ मध्ये जानेवारी २०१५ अखेर ९३७ कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) कृषी पंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरिता महावितरणकडून इन्फ्रा-२ योजने अंतर्गत कामे करण्यात येणार आहेत. याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सर्वेक्षणाचे काम सुध्दा सुरु झालेले आहे.

(३) शेतक-यांना कृषी पंप जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने एकजन्सीची नेमणूक केली असून संबंधितांकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाबार्डकडून प्राप्त निधीतून जेट्टींचे प्रस्तावीत केलेल्या बांधकामाबाबत**

**(६) * ३८७७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सागरी किनारा लाभलेल्या जिल्ह्यात नाबार्डकडून मिळणा-या ग्रामीण पायाभूत विकास निधीतून नऊ ठिकाणी १२० कोटी रुपये खर्च करुन जेट्टीचे बांधकाम करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्राप्त निधीतून कोणत्या जिल्ह्यात व कोणत्या ठिकाणी जेट्टींचे बांधकाम करण्यासाठी प्रस्तावीत केले आहे,

(३) या प्रस्तावीत बांधकामांची सद्यःस्थिती काय आहे,

(४) उपरोक्त नऊ जेट्टींचे बांधकाम पूर्ण होऊन मच्छिमारांना याचा फायदा केव्हा पासून प्रत्यक्षात मिळणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) १) जि.मुंबई उपनगर - १) खारदांडा
२) जुहू-तारा
२) जि.रायगड - १) नवापाडा कोळीवाडा
२) थेरोंडा
३) एकदरा
३) जि.सिंधुदूर्ग १) तांबळडेग
२) केळूस
४) जि.पालघर १) झाई
२) केळवा-दादर

(३) सदर कामाच्या अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून तांत्रिक मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर कामे साधारणतः मे, २०१५ मध्ये सुरु होऊन अंदाजे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

**डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषि विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करुन घेण्याबाबत**

**(७) * ३२५५ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विजय सावंत, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषि विद्यापीठ दापोली यांच्या अधिपत्याखालील विविध संशोधन केंद्र, प्रक्षेत्र, महाविद्यालय, कृषितंत्र विद्यालय व अन्य योजना यांचे प्रक्षेत्रावर शेकडो मजूर २० ते २५ वर्षे रोजंदारी तत्वावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांना दिल्या जाणाऱ्या मजूरीचा दर काय आहे,
(३) २० ते २५ वर्षे रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रितिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) कृषि विद्यापीठामध्ये नियमित मजूरांची आवश्यकता असतांना गोरगरीब मजूरांना नियमित सेवेत सामावून न घेण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) प्रती दिन रु. १८०-/
(३) होय.
(४) व (५) शासन स्तरावर कार्यवाही प्रगती पथावर आहे.

-----------------

### राज्यात नापिकी आणि कर्जाला कंटाळून शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

**(८) * ३५५८ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: बीड, लातूर, हिंगोली, जालना, धुळे, उस्मानाबाद आणि सोलापूर जिल्ह्यात नापिकी आणि कर्जाला कंटाळून शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात आत्महत्या केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दिवसेंदिवस वाढत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत तसेच, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आतापर्यंत कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात प्रश्नाधिन जिल्ह्यातील एकूण २४ प्रकरणांपैकी ५ प्रकरणे छाननींअंती पात्र ठरली असून मयत शेतक-यांच्या कुटुंबियास रु. १.०० लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे. ०१ प्रकरण अपात्र ठरले असून १८ प्रकरणांची चौकशी सुरु आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शेतक-यांचे प्रबोधन/समुपदेशन करणे, तणावमुक्ती कार्यक्रम आयोजित करणे, आधुनिक शेती प्रशिक्षण, शेतक-यांना शासनाच्या विविध सोयी / सवलतीची माहिती अवगत करुन त्यांचा लाभ जास्तीत जास्त शेतक-यांना होईल याबाबत कार्यवाही करणे, इत्यादि उपाययोजना करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त/जिल्हधिका-यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पामधील सन १९७६ पुर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांबाबत**

**(९) * ३४६६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पामधील सन १९७६ पुर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांबाबत दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी वा त्यादरम्यान नाशिक विभागीय आयुक्तालयाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक असल्यामुळे उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सद्यस्थितीत पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे, नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. व या संदर्भात नियोजन विभागाच्या सूचनांनुसार सदर मूल्यमापन समितीमार्फत आढावा घेण्यात येत असून मूल्यमापन समितीच्या मान्यतेनंतर सादर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील रस्त्यांवर आणि पदपथांवर व्यावसायिकांनी केलेले अतिक्रमण

**(१०) * ३४११ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रस्त्यांवर आणि पदपथांवर पीएमपीचे शेकडो थांबे, वीज वितरण कंपनीचे डिपी बॉक्स, ट्रान्सफॉर्मर, महानगरपालिकेची सेवा केंद्रे अशा शासकीय अतिक्रमणाबरोबर छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनी सर्रास अतिक्रमण केल्याने शहरातील नागरीकांना रस्त्यावरुन/पदपथावरुन अत्यंत धोकादायक परिस्थितीतून चालावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शासकीय व अशासकीय अतिक्रमणे कमी करण्याबाबत वा उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील रस्ता रुंदीकरण होण्यापूर्वी महावितरण कंपनीचे डी.पी. बॉक्स, लघु/उच्चदाब फिडरपिलर रस्त्याच्या कडेला पुरेशा अंतरावर होते. परंतु रस्ता व पदपथ रुंदीकरणामुळे त्यापैकी काही भाग पदपथावर आला आहे.

(२) रस्त्यावरील व पदपथावरील वीज वितरण कंपनीचे डी.पी. बॉक्स, लघु/उच्चदाब फिडरपिलर महानगरपालिकेतर्फे महावितरण कंपनीच्या देखरेखीखाली पर्यायी जागेच्या उपलब्धतेनुसार इतरत्र स्थलांतरीत करण्याचे काम चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सौर ऊर्जेवर चालणारे कृषी पंप बसविण्याबाबत

**(११) * ३९३० श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सौरऊर्जेवर चालणारे कृषीपंप बसविण्याचे धोरण मा.मुख्यमंत्री यांनी घोषीत करण्यात येवून दरवर्षी पाच लाख सौर कृषीपंप बसविण्याची महत्वकांक्षी योजनाही माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहीर केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौरकृषीपंपासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात किती तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर योजनेत ४० टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरणे अपेक्षित असून दुष्काळात होरपळत असलेल्या शेतकऱ्यांना ४० टक्के रक्कम भरणेही शक्य होणार नाही, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, लवकरात लवकर सौरकृषीपंप बसविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकऱ्यांवरील आर्थिक बोजा कमी करण्याबाबत शासनाची भूमिका काय,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु झाली असून सध्या रु. १५५.७५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. उर्वरित निधी महावितरणने कर्जाद्वारे उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदरील योजनेस शासनाने दि. २४.०२.२०१५ रोजीच्या मत्रीमंडळात बैठकीत तत्वतः मान्यता दिलेली असून याबाबतचा शासन निर्णय पारीत झाल्यानंतर महावितरणमार्फत योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात येईल.

(५) योजनेमध्ये शेतक-यांच्या लाभार्थी हिस्सा ५ % ठेवण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात उपजिल्हाधिकारी पदावर काम करणा-या अधिका-यांना पदन्नोती मिळणेबाबत**

**(१२) * ३०३१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उपजिल्हाधिकारी पदावर काम करणा-या अधिका-यांना तब्बल १७ ते १८ वर्षापासून बढतीविना काम करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उपजिल्हाधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याने राज्य शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणताच निर्णय व कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) उपजिल्हाधिकारी पदावर १० वर्षापेक्षा जास्त सतत सेवा पूर्ण केलेला अधिकारी निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी संवर्गातील पदोन्नतीसाठी पात्र ठरतो. तथापि, उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात रिक्त जागांअभावी उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांना १० वर्षानंतरही पदोन्नतीसाठी वाट पहावी लागते, ही वस्तुस्थिती आहे.

सद्य:स्थितीत उपजिल्हाधिकारी संवर्गातील ८० अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) म्हणून पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. याशिवाय अपर जिल्हाधिकारी संवर्गातील संवर्ग संख्येमध्ये कालानुरुप बदल करण्याची बाबही शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तीन लाख कि.मी. रनिंग झालेल्या "कुल कॅब" निकामी करण्याबाबत**

**(१३) * ३२८१ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक, पुणे-मुंबई "कुल कॅब" धावत असतांत यातील काही कुल कॅबचे रनिंग ३ लाख कि.मी. झालेले आहे. त्यामुळे प्रवाश्यांच्या जिवीताला धोका असल्याचे संभवते. शहरातही चालविल्या जाणाऱ्या टॅक्सी ८ वर्षानंतर निकामी करावी लागण्याचे आदेश असूनही १५ ते २० वर्षे चालविल्या जातात असे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे का,

(२) असल्यास, शासनाच्या संबंधित विभागाने सदर प्रकारास जबाबदार असणाऱ्या आरोपींवर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(३) असल्यास त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयात अनेक गावांना दुष्काळ निधी वाटप होण्यास होत असलेला विलंब**

**(१४) * ३६६१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२ ला बुधवार दि.२४/१२/२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तहसिल अंतर्गत सन २०१२-१३ चा दुष्काळ निधी रु. ८४,५२,७१८/- ही रक्कम संबंधित लाभार्थ्यांना अद्याप वाटप करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची रक्कम संबंधित लाभार्थ्यांना केंव्हा वाटप होणार आहे व विलंबाची कारणे कोणती,

(३) निधी वितरणात झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(४) त्यानुसार दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, बीड यांना रु. ८५,७८,८६४/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) व (४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**नागपूर मधील बावनथडी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१५)** * **३९८२ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मधील बावनथडी प्रकल्पात अनेक शेतकऱ्यांची शेती व घरे अधिग्रहित करण्यात येवूनही त्यांचे अद्यापी पुनर्वसन करण्यात आलेले नाही तसेच ज्यांचे पुनर्वसन करण्यात आले त्यांना कोणत्याही मुलभूत सुविधा देण्यात आलेल्या नसल्यामुळे त्यांनी वारंवार आंदोलने व उपोषणे केल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याकरिता तसेच ज्यांचे पुनर्वसन करण्यात आले त्यांना सर्व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) बावनथडी प्रकल्पाग्रस्तांचे महाराष्ट्र प्रकल्पाबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पुनर्वसन करण्यात आले असून, पुनर्वसन ठिकाणी १८ नागरी सुविधा प्रकल्पयंत्रणेद्वारे पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रकल्पग्रस्तांना शासनातर्फे पॅकेज क्र-१ व पॅकेज क्र-२ नुसार आर्थिक मदत घोषित करण्यात आलेली आहे व त्याचे वाटप प्रकल्पाग्रस्तांना करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यात जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला तुटवडा

**(१६) * ४०२३ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात जनावरांच्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नांदेड जिल्ह्यातील जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) करिता प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती व आदिवासी शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत विशेष घटक योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान वाढविण्याबाबत

**(१७) * २९४८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन अनुसूचित जाती व आदिवासी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्याकरिता कृषी विभागामार्फत विशेष घटक अंतर्गत विविध योजना राबवित असून सदर योजनेच्या अनुदान मर्यादेपेक्षा प्रत्यक्षात खर्च जास्त होत असल्याने शेतकऱ्यांना स्वत:चे पैसे खर्च करावे लागत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान योजनेची रक्कम शासन वाढविणार आहे काय,

(३) याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अंशतः हे खरे आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम वाढविण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खांबावरील तारा तुटून लाखो रूपयाचे झालेले नुकसान

**(१८) * ३१०० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विजय सावंत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गट नं. ४३०, ४९८, ६९४ व ५०५ मधील शेती व बागायतीमध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खांबावरील तारा तुटून लाखो रूपयांचे नुकसान होवूनही अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेचा फेरपंचनामा करून क्र.प्रशासन/कावी-६४६/१४ तहसिलदार, खेड यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आल्याचे तहसिलदार, खेड (जि.रत्नागिरी) यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू घटनेस ४ वर्षाचा कालावधी होवूनही अद्यापही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गरिब शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, नुकसानग्रस्तांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासन स्तरावर कोणती ठोस कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१) नुकसानीचा कोणताही अहवाल व रक्कम मिळण्याबाबतचा अर्ज तसेच त्यासंबंधीच्या कागदपत्रांची पूर्तता महावितरण कंपनीकडे केलेली नाही.

२) सदर प्रकरणाची दिनांक २.४.२०११ रोजी मंडळ अधिकारी कूळवंडी यांनी केलेल्या पंचनाम्याची छायांकित प्रत दिनांक १९.११.२०१३ रोजी प्राप्त झाली. परंतु पंचनाम्यात लिहिलेली रक्कम अक्षरी व अंकी यामध्ये तफावत होती. तसेच जळीत साग, आंबा व काजू या झाडांचे वय व त्यानुसार कृषी खात्याकडून केलेले मुल्यांकन नव्हते.

३) तालुका कृषी अधिकारी खेड यांनी दिनांक ११.११.२०१४ च्या पत्रान्वये जिवंत झाडांचे मुल्यांकन केले जात असल्याचे नमूद केले आहे.

४) दिनांक १३.१२.२०१३ रोजी सदर जागेवरील झाडांच्या वस्तुस्थितीची पाहणी करुन त्याचा पंचनामा तहसिलदार, खेड यांच्या दिनांक १८.१२.२०१३ च्या पत्रान्वये महावितरण कंपनीस प्राप्त झाला आहे. परंतु त्या पंचनाम्यामध्ये पूर्वी जळालेल्या झाडांचे नुकसानीचे सक्षम अधिका-यांचे मुल्यांकन देण्यात आलेले नाही.

५) पूर्वी जळालेल्या झाडांचे योग्य ते मुल्यमापन अद्याप न मिळाल्यामुळे पुढील कार्यवाही करता येत नाही.

(४) नुकसान भरपाईबाबतची कायदेशीर कागदपत्रे संबंधितांकडून प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील गागोदे गावातील १६५ हेक्टर क्षेत्र असलेला डोंगर काही समाजकंटक एका प्रसिध्द उद्योगपतींला विकत असल्याबाबत**

**(१९) * ३०८१ ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचार्य विनोबा भावे यांच्या कुटूंबियांनी भूदान चळवळीत दिलेला रायगड जिल्ह्यातील गागोदे गावातील १६५ हेक्टर क्षेत्र असलेला डोंगर गावातील काही समाजकंटकांनी ७० कोटी रूपयांना एका प्रसिध्द उद्योगपतींला विकायला काढला असल्याचा धक्कादायक प्रकार माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रस्तूत प्रकरणी दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) या प्रकारची अद्याप चौकशी केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे गागोदे बु.ता.पेण जिल्हा रायगड येथील एका जमिनीविषयी "भूदानातील डोंगर विक्रीचा घाट" अशा आशयाची बातमी दि. १९/०१/२०१५ रोजी एका वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने दि. २०/०१/२०१५ रोजी तहिसलदार, पेण, जि.रायगड यांनी मौजे गागोदे बु. येथे प्रत्यक्ष भेट देऊन स्थळ पाहणी व अभिलेखावरुन खात्री केली असता सदर बातमीत काहीही तथ्य असल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या चार जिल्ह्यातील माती परिक्षणासाठी आवश्यक असलेली विषयतज्ञ व चालक यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२०) * ३९१० श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या चार जिल्ह्यासाठी ५ कोटी ६० लाख रुपये खर्च करुन फिरत्या माती परिक्षणाची वाहने खरेदी करण्यात आली. परंतु, विषयतज्ञ व चालकासह ५० पदे रिक्त असल्याने माती परिक्षणासाठी घेतलेली वाहने जैसे थे स्थितीत उभी आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माती परिक्षणासाठी आवश्यक असलेली विशेषतज्ञ आणि इतर ५० पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, सदर रिक्त पदे भरली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

नियोजन विभागाच्या मानव विकास कार्यक्रमांतर्गत क्षेत्रीय स्तरावर चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या चार जिल्ह्यांसाठी २ कोटी ८० लाख रुपये खर्च करुन फिरत्या माती परिक्षणची ८ वाहने खरेदी करण्यात आली आहेत. या संदर्भात चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) व (३) कृषि विद्यापाठांर्गत पदभरतीची प्रक्रिया महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद व कृषि विद्यापीठ स्तरावर केली जाते. कृषि विद्यापीठातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्देश दिले आहेत. कृषि विज्ञान केंद्रातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे स्तरावर सुरू आहे.

-----------------

**वीज वितरण करणाऱ्या एसएनडीएल फ्रेंचायझी यांच्या कंत्राटदारांचे तब्बल १५ कोटी रुपयांचे बिल दिले नसल्याबाबत**

**(२१) * ३८३४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या महाल, गांधी बाग, सिव्हील लाईन्स विभागातील वीज वितरण करणाऱ्या एसएनडीएल फ्रेंचायझी यांच्या कंत्राटदारांचे तब्बल १५ कोटी रुपयांचे बिल दिले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच कंत्राटदारांचे १५ कोटी रुपये देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) कंत्राटदाराचे १५ कोटी रु. बिल न दिल्याने ग्राहकांवर अन्याय झाला आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) बिलांची पडताळणी व अंकेक्षण प्रलंबित असल्याने बिले देण्यास विलंब झाला आहे.

(३) एस.एन.डी.एल. व कंत्राटदार यांच्यात आपसातील सामंजस्याने थकीत देयकांपैकी एकूण रु. ७.९५ कोटी कंत्राटदारास अदा करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) नाही.

-----------------

## राज्यातील घरगुती वीज दरवाढ कमी करण्याबाबत

**(२२) * ३६०१ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्युत मंडळाच्या महावितरण वीज कंपनीने राज्य विद्युत नियामक आयोगाकडे राज्यातील घरगुती वीजदरात १२ टक्के वाढीचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरगुती ग्राहकांवर १२ टक्के दरवाढीचा प्रस्ताव आयोगाकडे पाठविण्याची कारणे काय आहेत, या आधीसुद्धा राज्यातील घरगुती वीज ग्राहकांवर २० टक्के दराने वाढ करण्यात आली होती, हेही खरे आहे काय,
(३) ही दरवाढ कमी करण्याबाबत महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेच्यावतीने शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे. महावितरणाने बहुवार्षिय वीज दराबाबतची सुधारित याचिका दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी आयोगाकडे दाखल केली आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. डिसेंबर २०१४ पासून घरगुती ग्राहकांना वीज दरात देण्यात येत असलेले अनुदान बंद झाल्याने ग्रांहकांचे देयकात वाढ झाली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) वीज दर निश्चित करण्याची कार्यवाही एमईआरसीच्या कार्यकक्षेत येते.

-----------------

## अलिबाग जि.रायगड येथिल सी.आर.झेड कायदा धाब्यावर बसवून केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(२३) * २७३४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी आर झेड कायद्यानुसार समुद्र भरती रेषेपासून ५०० मीटर पर्यंत बांधकाम करण्यावर निर्बंध असतानाही सदरहू नियम धाब्यावर बसवून आलिबाग, मुरूड समुद्र किनारी सुमारे २४६ हून अधिक अनधिकृत बंगलेवजा बांधकाम करण्यात आले असून, त्यासाठी स्थानिक

ग्रामपंचायत पदाधिकारी, संबंधित अधिकारी यांना हाताशी धुरून व शासकीय जमिनी गिळंकृत करून अनधिकृत बांधकामे केल्याचे उघडकीस आल्यामुळे या बंगल्यांची चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रायगड यांनी उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसिलदारांना दिलेले आहेत हे खरे आहे काय,

(२) जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी संबंधित अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विरोधात नोटीसा बजावणाऱ्या व्यतिरिक्त सदरहू बांधकामे निष्कासित करण्याच्या दृष्टिने कोणतीही कारवाई आजामितीस केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) जिल्हाधिकारी रायगड यांनी या अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करण्याचे आदेश देऊन दहा महिन्याहून अधिक कालावधी लोटलेला असतानाही सदरहू २४६ अनधिकृत बांधकामापैकी एकही बांधकाम निष्कासित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(४) अद्यापी याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अलिबाग तालुक्यात १४५ व मुरुड तालुक्यात १४१ अशी एकूण २८६ अनधिकृत बांधकामे सी.आर.झेड. क्षेत्रात असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर सर्व अनधिकृत बांधकामे खाजगी जमिनीवर असून शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही. सदर अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.११/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी अलिबाग यांना दिलेल्या आहेत.

(२), (३) व (४) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदींचा भंग करुन अनधिकृत बांधकाम केल्याबद्दल अनधिकृत बांधकाम करणा-याविरुद्ध जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडून नोटीसा देण्यात आल्या आहेत. अलिबाग तालुक्यातील सदरहू एकूण १४५ अनधिकृत बांधकामांपैकी १५ बांधकामधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून मुरुड तालुक्यात एकूण १४१ अनधिकृत बांधकामांपैकी २२ बांधकामधारकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे अलिबाग तालुक्यातील सी.आर.झेड. क्षेत्रातील अनधिकृत बांधकामधारकांकडून रक्कम रु.४९,६२,३२६/- तर मुरुड तालुक्यातील अनधिकृत बांधकामधारकांकडून रक्कम रु.४१,४०,८५६/- इतकी दंडनीय रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित अनधिकृत बांधकामाबाबत सहायक संचालक नगर रचना अलिबाग यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यांचेविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

-----------------

**सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात डाळींब शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(२४) * ३२२३ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात सतत होणाऱ्या वातावरणातील बदलांमुळे डांळीब या पिकावर तेल्या व अन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने तसेच बागा वाचविण्यासाठी करण्यात आलेला खर्च व डांळिबांचे कोसळलेल्या दरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या निकषांनुसार सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये जानेवारी, २०१५ च्या सुमारास बदलत्या हवामानामुळे डांळीब या पिकावर तेल्या व अन्य रोगामुळे झालेले नुकसान ५० टक्के पेक्षा कमी असल्याने सदर नुकसानीच्या क्षेत्रास मदत अनुज्ञेय नाही.

-----------------

**पाथरी जिल्हा परभणी येथील वक्फ मालमत्तेबाबत**

**(२५) * २७८९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४९३ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी जिल्हा परभणी येथील नामदेव नगरातील मगबरा मैदान येथील मालमत्ता वक्फ बोर्डाची मालमत्ता असूनही जिल्हा प्रशासनाने पुरातत्व विभागाकडे माहिती मागविण्याबाबतचा आक्षेप परभणी-हिंगोलीचे लोकप्रतिनिधी यांनी अतिरिक्त मुख्य सचिव (अल्पसंख्याक) यांच्याकडे सन २०१५ मध्ये वा त्यासुमारास नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील मालमत्तेबाबत पुरातत्व विभागाकडून जाणीवपूर्वक वेळकाढू धोरण राबविण्यात येत असल्याबाबतचाही आक्षेपही त्याच अर्जात नोंदविला आहे काय,

(३) असल्यास, पुरातत्व विभागाकडून तात्काळ कारवाई करण्याबाबत तसेच संबंधित वक्फ मालमत्तेवरील विकास कामे पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही. नगर परिषद पाथरी, जि.परभणी हद्दतील सर्वे नं. ५७ मधील मकबरा मस्जीद (नामदेव) ची दि. ५.९.१९७४ च्या शासन राजपात्रात (वक्फ मंडळ) वक्फ मालमत्ता म्हणून नोंद आहे. उपविभागीय दंडाधिकारी, पाथरी यांनी त्यांच्या दि.१.९.२०१४ च्या पत्रान्वये या इमारतीची पुरातला विभागाकडून तपासणी करुन अभिप्राय देण्याची उपसंचालक, पुरातत्व विभाग, नांदेड यांना विनंती केली होती. त्यास अनुसरुन सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, नांदेड यांनी त्याच्या दि. ४.३.२०१५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार सदर ठिकाणी अस्तित्वात असलेली वास्तु ही मुळतः मस्जीद असल्याचे व पुढच्या भागात असलेले पाण्याचे टाके हे वजू करण्याचे ठिकाण (vazu tank) असल्याचे व मध्ययुगीन काळात बांधण्यात आलेल्या सर्वच मस्जीद बांधकाम शैलीत हे वजू करण्याचे पाण्योचे टाके दिसुन येत असल्याचे व त्याचप्रमाणे मस्जीदच्या पुढच्या भागात असलेल्या चार कबरी या बांधकाम शैली व बनावटीवरुन मुस्लीम कबरी असल्याचे दिसुन येत असल्याने या सर्व बाबींचा विचार न करता सदरहू ठिकाण मस्जीद परिसर आहे असे दिसत असल्याचा अहवाल सादर केला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नांदेड यांच्या उपरोक्त अहवालाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याच्या जिल्हाधिकारी, परभणी यांना दि. ५.३.२०१५ च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, कल्याण व डोंबिवली मध्ये वीज वापराची चुकीची नोंद करून वाढीव वीज बिल आकारल्याबाबत

**(२६) * ४१९५ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण, डोंबिवलीत वीज वापराच्या चुकीच्या नोंदी करुन मीटरवाचन करणारे ग्राहकांवर वाढीव बिल मनमानी पध्दतीने आकारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजबील कामांमध्ये निष्काळजीपणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे. वीज ग्राहकांना मनमानी पध्दतीने बील आकारण्यात येत नसून त्यांच्या विद्युत वापरानुसार विद्युत देयक दिली जातात. परंतु जानेवारी, २०१५ मध्ये कल्याण शहरांतर्गत ३३४ वीज ग्राहकांचे मीटर वाचन चुकीचे झाल्याचे

आढळून आले आहे. त्यामध्ये दुरुस्ती करुन देण्यात आली. डोंबिवली विभागामध्ये उपविभाग ३ अंतर्गत Hand Held Unit च्या तांत्रिक दोषामुळे २४ वीज ग्राहकांचे प्रत्यक्ष मीटर वाचन पध्दतीने रिडींग घेण्यात आले. त्यामुळे सदर वीज ग्राहकांना ३० ऐवजी ३१ ते ३८ दिवसांची वीज वापराची देयके गेली होती. त्याची दुरुस्ती पुढील महिन्यांच्या वीज देयकामध्ये करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मीटर वाचन एजन्सीच्या चुकीच्या वाचनाबद्दल कामाच्या आदेशातील तरतूदीनुसार संबंधित एजन्सीस रु. २४,३२५ दंड आकारण्यात आला असून सदर रक्कम एजन्सीच्या देयकातून वसुल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा राबविण्याबाबत**

**(२७) * ४२१३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोहत्या बंदी कायदा राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप, याबाबतची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९७६ हा दि. १५.४.१९७८ पासून लागू करण्यात आला व या कायद्यानुसार दि. १५.४.१९७८ पासून राज्यात गायींची कत्तल करण्यास बंदी करण्यात आली आहे. सदर कायद्यामध्ये सुधारणा करुन, राज्यात गोवंश हत्याबंदी विधेयक (१९९५) लागू करण्यासाठी सदर विधेयक मा.राष्ट्रपतींच्या अनुमतीसाठी सादर करण्यात आलेले होते. आता सदर विधेयकास मा.राष्ट्रपती यांची मान्यता प्राप्त झालेली आहे. व महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा दि. ४ मार्च, २०१५ पासून लागू करण्यात आला आहे. आता महाराष्ट्र राज्यात सदर कायद्यानुसार गाय, वळू व बैल म्हणजे संपुर्ण गो-वंशाची कत्तल करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर येथील महाऔष्णिक वीज केंद्रातील २१० मेगावॅटच्या संचातून होत असलेले प्रदूषण रोखण्याबाबत**

**(२८) * ४६२७ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील महाऔष्णिक वीज केंद्रातील २१० मेगावॅटच्या संचातून प्रदूषण होत असल्याने प्रदूषण नियंत्रण महामंडळाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात वीज टंचाईची तीव्र झळ नागरिकांना सोसावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या संचातील प्रदूषण रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रातील जुन्या २१० मेगावॅट क्षमतेच्या संचाच्या ईएसपीचे आधुनिकीकरण करण्याकरीता उपाययोजना सुचविण्याकरिता महाजेनको कंपनीने मे.टाटा कन्सल्टिंग इंजिनिअरींग कंपनी, कोलकत्ता यांना कंत्राट दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यात समुद्र किनाऱ्यावरील रेतीची अवैध तस्करी होत असल्याबाबत**

**(२९) * ४६४० श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात समुद्र किनाऱ्यावरील रेतीची मोठ्या प्रमाणावर अवैध तस्करी होत असून किनाऱ्यालगतच्या झाडांचे अस्तित्वही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजरोसपणे अवैध रेतीची होणाऱ्या तस्करीकडे पोलीसांकडून ठोस कारवाई होत नसून शासनाचा लाखो रुपयांचा रॉयल्टीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची शासनाने पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने डहाणू समुद्र किनाऱ्यावरील रेतीची होणारी अवैध तस्करी रोखण्यासाठी आतापर्यंत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) डहाणू तालुक्यात अवैध रेती उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, रेती उत्खननामुळे समुद्र किनार्‍यावरील झाडांचे अस्तित्व नष्ट होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) डहाणू तालुक्यात गौण खनिजाचे अवैधे उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत केलेल्या भरारी पथकाने सन २०१४-१५ या वर्षात रुपये ९,२०,१८०/- इतका दंड वसुल करुन, २ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच डहाणू पोलीसामार्फतही अवैध रेती वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास महसूल यंत्रणेशी संपर्क साधून संबंधितावर संयुक्तरित्या कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### अंबाजोगाई (जि.बीड) येथील परिवहन कार्यालय अंबाजोगाई येथेच कार्यरत ठेवण्याबाबत

**(३०) * ५२०७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे बीड येथे स्थलांतरित करण्याच्या सुचना परिवहन विभागामार्फत निर्गमित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई येथील परिवहन कार्यालयाचे महसूल उत्पन्न, बीड व उस्मानाबाद येथील परिवहन कार्यालयापेक्षा जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबाजोगाई येथील परिवहन कार्यालय अंबाजोगाई येथेच कार्यरत ठेवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंबाजोगाई येथील परिवहन कार्यालय अंबाजोगाई येथेच कायम ठेऊन तेथील रिक्त जागा भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) होय.

(४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई येथे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदाची २ पदे मंजूर होती. त्यानंतर दि. ३१.१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये महसूल वाढीसाठी तसेच परिणामकारक काम होण्यासाठी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांची ११ पदे वाढविली असून एकूण पदे १३ झाली आहेत. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांच्या वारसांना एसटीच्या नोकरभरतीत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत**

**(३१) * ५२५८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात.:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एस.टी.) चालक, वाहक, मेकॅनिक व इतर तांत्रिक कर्मचा-यांच्या वारसांना एस.टी.च्या नोकर भरतीत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत संचालक मंडळाने ठराव क्र. २०१४.०८.०६, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ अन्वये तत्वतः मान्यता दिली असून महामंडळास्तरावर कायदेशीर बाबींची तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत कायदेशीर बाबींची तपासणी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येणार आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कायदेशीर बाबी तपासणी करण्याची कार्यवाही सुरु असून संबंधित तपासणी पुर्ण झाल्यानंतर महामंडळाच्या प्रस्तावाचा शासनस्तरावर विचार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबत**

**(३२) * ५३८९ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यात शासनाने दारुबंदी जाहीर केली त्याचप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यातही दारुबंदी करण्याबाबत महिला संघटनानी संबधीताकडे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्याप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यातही दारुबंदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) निवेदनाद्वारे जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबत नियमात तरतूद नाही. तथापी एखाद्या गावात किंवा प्रभागात दारुबंदी अधिसूचना दि. २५ मार्च, २००८ व दि. १२.२.२००९ नुसार विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांकडे निवेदन दिल्यास त्यांच्याकडून संबंधित गावात किंवा प्रभागात दारुबंदी करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते. सद्यस्थितीत यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोरेगाव (मंबई) येथील आरे वसाहतीत वाढत असलेल्या अनधिकृत झोपड्यांबाबत**

**(३३) * ५६३६ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मंबई) येथील आरे वसाहतीत आजमितीस एकूण १५ ते २० हजार झोपडया असून यात काही अधिकृत तर काही अनधिकृत असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९४ च्या दरम्यान आरेमध्ये अंदाजे ४ ते साडेचार हजाराच्या आसपास झोपडया असल्याचे कागदपत्रावरुन दिसते. मात्र आरे वसाहतीच्या देखरेखीसाठी व जोपासनेसाठी आरेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्याखाली विविध खात्यात शेकडो अधिकारी व कर्मचारी कार्यरत असताना गेल्या पंधरा वर्षात वीस हजारपर्यंत झोपडया कशा वाढत आल्या याबाबतची शासनाने रितसर चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, “आरे वाचवा, घरे वाचवा” ही मोहीम जन आधार सामाजिक प्रतिष्ठान ही सेवाभावी संस्था राबवीत असून त्यांना येथील जनतेने पाठींबा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील झोपडयांच्या वाढीला संबंधित अधिकारीच जबाबदार असल्यास, त्याचेवर शासन कोणत्या स्वरुपाची कारवाई करणार आहे,

(५) उपरोक्त प्रकरणी कोणतीच कारवाई केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा आशयाची बातमी मुंबईतील एका दैनिकामध्ये दि. ०९/०२/२०१५ रोजी प्रसिध्द झाली आहे, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) आरे दुग्धवसाहतीमधील अतिक्रमणासंदर्भात एक सहाय्यक सुरक्षा अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गोदापात्रातून मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(३४) * ५६४४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गोदापात्रातून सध्या मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा होत असताना महसूल व पोलीस विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर व अवैध वाळू उपसा होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष व टाळाटाळ करणाऱ्या महसूल व पोलीस विभागावर कारवाई करण्याबाबत तसेच अवैद्य वाळू उपसा त्वरीत थांबविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते. सदर पथकाद्वारे एप्रिल २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीत ८९ प्रकरणात रुपये १४,१२,१००/- इतका दंड वसूल करुन व त्यापैकी ५८ प्रकरणात पोलीसात गुन्हे दाखल करुन ९२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील मल्टिप्लेक्सचालकांनी गोळा केलेला कर राज्य सरकारच्या तिजोरीत भरण्याबाबत**

**(३५) * ५६६१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करमणूक कर तीन वर्षासाठी माफ असताना पुण्यातील मल्टिप्लेक्सचालकांनी गोळा केलेला कर राज्य शासनाच्या तिजोरीत माहे जानेवारी, २०१५ अखेर भरण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार थकीत करमणूक कराचा विषय निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदर प्रकरणात शासनाकडे दाखल करण्यात आलेल्या अपीलात तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी अंतिम निर्णय होईपर्यंत वसुलीस स्थगिती दिली असल्याने करमणूक शुल्क भरणा अद्याप करण्यात आलेला नाही.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांच्या स्तरावर अपीलाबाबत सुनावणी घेऊन अंतिम निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे वितरत करण्यात आलेल्या कर्जाबाबत**

**(३६) * ५७५३ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी देण्यात यावयाच्या १०० कोटी रुपयाच्या निधीसाठी राज्य शासन हमी देणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजतागायत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे वितरत करण्यात आलेल्या कर्जापैकी किती कर्जाची परतफेड महामंडळाकडे झाली आहे,
(३) उर्वरीत कर्जाच्या वसुलीकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाने वितरित केलेल्या कर्जापैकी रु. १३८८.४० लाख इतकी कर्जाची परतफेड महामंडळाकडे झाली आहे.
(३) कर्जवाटप करताना महामंडळामार्फत कर्ज वसुली बाबतचे आगाऊ दिनांकित धनादेश (P.D.C.) वटला गेला नाही तर संबंधितांकडून कर्जवसुलीसाठी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट च्या कलम, १३८ अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायदेशीर सल्लागाराची नियुक्ती करण्याची तसेच अशा लाभार्थ्यांना व त्यांच्या जमीनदारांना सूचना देण्याची कार्यवाही महामंडळामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औसा (जि.लातूर) तालुक्यातील सोयाबीन बियाणे न उगविल्याने त्यांचे पंचनामे करुनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न दिल्याबाबत**

**(३७) * ५९८७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील कंपन्यांचे सोयाबीन बियाणे न उगविल्याने त्यांचे पंचनामे कृषी विभागाने केल्यानुसार भरपाई देण्याच्या सूचना कंपनीस करण्यात आल्या असता या कंपन्यांकडून सध्या शेतक-यांना भरपाई देण्यात येत असली तरी कंपनीच्या काही अधिका-यांकडून लेबल, टॅग नाही म्हणून अडवणूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नुकसान भरपाई न देणा-या कंपन्यांच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी लातूर यांनी बातमीची दखल घेवून तक्रारदार शेतकरी, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, लातूर आणि कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांची सुनावणी घेऊन महाबीजला पंचनाम्याच्या आधारे देय होणारी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यास अदा करण्याचे आदेशीत केले. त्याप्रमाणे तक्रारदार शेतकऱ्याला ३ बियाण्याच्या बॅगापोटी ७,१५५/- एवढी रक्कम धनादेशाव्दारे अदा करण्यात आलेली आहे.

महाबीज अकोला यांचेकडून २१३ बॅगापोटी ५,०८,००५/- रु.७७ शेतकऱ्यांना मदत देण्यात आलेली असून १९ शेतकऱ्यांना ६३ बॅगापोटी १,५०,२५५/- रु. देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सर्वच क्षेत्रात शेतीसाठी पीक विमा पध्दत लागू करण्याबाबत**

**(३८) * २८७१ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच क्षेत्रात विमा लागू असतांना शेतीसाठी मात्र विमा पध्दत लागू केली नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक विमा लागू केल्यास शेतकऱ्यांना एक हमी मिळते व त्यामुळे आत्महत्या थांबण्यास मदत होण्याकरिता पिकविम्याबाबत शासनाने कोणते धोरण राबविले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या योजना राबविल्या आहेत वा येणार आहेत,

(४) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. रब्बी हंगाम १९९९-२००० पासून शेती विकासाठी राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यात येत आहे. तसेच रब्बी हंगाम २०१३-१४ पासून हवामान आधारित पिक विमा योजना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी १९९९-२००० पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात क्षेत्र हा घटक (Area approch) केंद्र शासनाच्या भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत राज्यात राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्ति, किडी आणि रोगामुळे पिकाचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतक-याला विमा संरक्षण दिले जाते. कर्जदार व बिगर कर्जदार शेतक-यांना सदरची योजना ऐच्छिक स्वरुपाची आहे. राज्य शासनाकडून विमा हप्ता रकमेत अल्प व अत्यल्प शेतक-यांना १० टक्के अनुदान दिले जाते. तर विदर्भातील ६ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतक-यांना विमा हप्ता रक्कम वाढीव ७० टक्के पर्यंत अनुदान दिले जाते.

अपूरा पाऊस, पावसात पडणारा खंड, अती पाऊस, धुके व सापेक्ष आर्द्रता या हवामान घटकांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतक-यांना विमा संरक्षण देण्यासाठी हवामान आधारित पिक विमा योजना राज्यात हब्बी हंगाम २०१३-१४ पासून निवडक जिल्ह्यात निवडक पिकांसाठी राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात मोठया प्रमाणात भारनियमन असताना नवे वीज प्रकल्प उभारण्याबाबत**

**(३९) * ३४३० श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात मोठया प्रमाणात भारनियमन असून वीज प्रकल्प उभारण्याची आवश्यकता असताना नवे वीज प्रकल्प उभारले जात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच जिल्ह्यात वीज पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही. राज्यात राज्य विद्युत नियामक आयोग, यांच्या निर्देशाप्रमाणे व आवश्यकतेनुसार वाहिनीनिहाय भारनियमन करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जुने व कालबाह्य झालेले रोहित्रे, पोल, तारा इत्यादी वेगवेगळया योजने अंतर्गतच्या कामात बदलून त्या ठिकाणी नवीन रोहित्रे, पोल, तारा बसवले जातात. तसेच उपकेंद्र, रोहित्रे, उच्चदाब, लघुदाब वीज वाहीनी, व इतर विद्युत उपकरणांच्या

देखभालीची कामे संबंधित शाखा/उपविभागीय कार्यालय पातळीवर वेळोवेळी करण्यात येतात. विद्युत उपकरणे तांत्रिक बिघाड होऊन नादुरुस्त झाल्यास तातडीने दुरुस्तीची कामे करुन वीज पुरवठा पूर्ववत/सुरळीत करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात अवकाळी पावसामुळे आंबा व काजू बागायतदारांचे झालेले नुकसान**

**(४०) * ५०१८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात ढगाळ वातावरण असल्याने शेतकरी चिंतेत असतांना दिनांक १ व २ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, काजू बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‍नुसार फळबाग नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच आर्थिक मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दुष्काळ व अतिवृष्टीमुळे बागायत शेतकरी व फळबागांसाठी जाहिर केलेले तुटपूंजे अनुदान वाढविण्याबाबत**

**(४१) * ५१८८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात गत तीन वर्षापासून पडलेला दुष्काळ व अतिवृष्टीमुळे तेथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, शासनाने कोरडवाहू शेतीसाठी ४५०० रुपये व बागायती शेतीसाठी हेक्टरी ९००० रुपये व फळबागांसाठी हेक्टरी १२००० रुपयांचे अनुदान जाहीर केले असून सदरील रक्कम तुटपूंजी असून शेतकऱ्यांचा खर्च यापेक्षा किती तरी जास्त झाल्याने वरील जाहीर केलेल्या अनुदानावर शेतकरी समाधानी नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनुदान त्वरीत वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) व (३) नैसर्गिक आपत्तीचे गांभीर्य पाहता केंद्र शासनाने विहित केलेल्या दारापेक्षा राज्य शासनाने वेळोवेळी आपदग्रस्तांना विहित दरापेक्षा अधिक दराने मदत दिलेली आहे.

-----------------

**खामगांव, जि.बुलडाणा परिसरातील म.रा.वि.वि.कं. मर्या. मधील INFRA-२ या योजनेची कामे तात्काळ सुरू करणेबाबत.**

**(४२) * ४०५० श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव मतदार संघात INFRA-२ या योजनेत म.रा.वि.वि.कं.मर्या. या योजनेअंतर्गत बरीचशी कामे मंजुर झाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची कामे अशोका बिल्डकॉन या कंपनीला मिळाले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत कामे न सुरू केल्याने शेतकऱ्यांना हालअपेष्ठा सहन कराव्या लागत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामे अशोका बिल्डकॉन कंपनीने लवकरात लवकर करणेबाबत संबंधितांना तात्काळ आदेश देण्यात येणार आहेत काय,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) होय.
(३) नविन कृषीपंप जोडण्याकरिता मार्च २०१४ अखेर प्रलंबित असलेल्या ६७३ कृषीपंप ग्राहकांची यादी कंत्राटदारास हस्तांतरीत करण्यात आली असून सर्वेक्षण व पोल वाहतुकीचे काम हाती घेण्यात आलेले आहे.
(४) कंपनीने कामाला सुरुवात केली असून निविदेच्या नियम व अटीनुसार "माईलस्टोन" प्रमाणे काम न केल्यास कामे तातडीने पूर्ण करण्यासाठीची नोटीस (Notice to correct) देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाचे प्रकल्पग्रस्त जमीन व नागरीसुविधांपासून वंचित राहिल्याबाबत**

**(४३) * ३८७४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरण जलविद्युत प्रकल्पासाठी ९८ मूळ वसाहती व १२५ वाड्यातील जमीन व घरे सन १९५४ ते १९६४ या दरम्यान संपादित करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन संपादित करताना विस्थापित शेतकऱ्यांना महाराष्ट्रात जेथे वसाहत कराल तेथे जमीन व नागरी सुविधा पुरविण्यात येतील असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात खालापूर, पनवेल, पेण व माणगांव भागात कोयना प्रकल्पग्रस्तांच्या सुमारे ४५ वसाहती असून अद्याप या ठिकाणी शासनाकडून देण्यात आलेल्या आश्वासनानुसार १८ सुविधांपैकी केवळ १० सुविधा देखील गेल्या ५५ वर्षात पूरविण्यात आल्या नाहीत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाकडून तातडीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

रायगड जिल्ह्यात रोहा, पनवेल, पेण, खालापूर, माणगांव व सुधागड तालुक्यात कोयना प्रकल्पग्रस्तांच्या एकूण ३५ वसाहती व १२ वाड्या, पाडे आहेत.

(४) सदर वसाहती, वाड्या व पाडे यांमध्ये देय असलेल्या एकूण नागरी सुविधांपैकी पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांची संख्या १४८ असून, उर्वरित नागरी सुविधा पुरविण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ता.दापोली हर्णे बंदराजवळ शॉर्टसर्कटिमुळे जळून खाक झालेल्या मच्छिमारांच्या नौका आणि झोपड्यांना मदत मिळण्याबाबत**

**(४४) * ४७४५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील हर्णे बंदराजवळ उभ्या असलेल्या सहा मच्छिमारी नौका आणि आठ झोपड्या दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान वीज वाहिनीत शॉटसर्कीट होवून जळून खाक झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग कशामुळे लागली याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या आगीत किती लाख रुपयांचे नुकसान झाले,

(४) असल्यास, याबाबत शासनाने आपादग्रस्तांना किती मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप मदत केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) होय.

(३) विद्युत कारणामुळे आग लागली नसल्याने नुकसान मुल्यांकनाचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पामधील पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधाबाबत**

**(४५) * ४७९७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पामधील सन १९७६ पुर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवायच्या नागरी सुविधांबाबत दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास नाशिक आयुक्तालयाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक असल्यामुळे उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सद्य:स्थितीत पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे, नाशिक जिल्ह्यातील गिरण्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. व यासंदर्भात नियोजन विभागाच्या सूचनांनुसार सदर मूल्यमापन समितीमार्फत आढावा घेण्यात येत असून मूल्यमापन समितीमार्फत आढावा घेण्यात येत असून मूल्यमापन समितीच्या मान्यतेनंतर सादर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी यवतमाळ जिल्ह्यासाठी ८८ कोटी रुपयांचे कंत्राट पुण्यातील स्पेस एज कंपनीला दिल्याबाबत**

**(४६) * ५६१७ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी यवतमाळ जिल्ह्यासाठी ८८ कोटी रुपयांचे कंत्राट पुण्यातील स्पेस एज कंपनीला देण्यात आले असून हे कंत्राट १७ टक्के जादा दराने दिले गेले असल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे. पायाभूत आराखडा-२ अंतर्गत यवतमाळ, पुसद व पांढकरवडा विभागातील टेंडर ई-टेंडरींग पध्दतीने मे. स्पेस एज असोशिएट्स कं.प्रा.लि. तथा मे. स्किपरर्स इंजिनिअर्स ह्या कंपनीला संयुक्तरित्या (+) १५% अधिक दराने प्रदान करण्यात आलेले आहे.

(२) ई-टेडरींगच्या माध्यमातुन निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून सदर प्रक्रिया पुर्णतः पारदर्शक आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरण व महानिर्मिती या दोन्ही कंपन्यांमधील भांडवली खर्च हा खासगी कंपन्यापेक्षाही अधिक असल्याबाबत**

**(४७) * ३९७१ श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण व महानिर्मिती या दोन्ही कंपन्यांमधील भांडवली खर्च हा खाजगी कंपन्यापेक्षाही अधिक असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खर्चावर नियंत्रण नसल्याने राज्यात वीज महाग झाली असल्याने औद्योगिक विकासाला अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण व महानिर्मितीचा कारभार वीज आयोगाने ठरविलेल्या धोरणानुसार चालविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमूर्तींची नियुक्ती करणे तसेच ऊर्जा सचिवांना निलंबित करण्याची मागणी वीज ग्राहक संघटनेच्या अध्यक्षांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमूर्तीची नियुक्ती करण्याबाबतची मागणी वीज ग्राहक संघटनांच्या अध्यक्षांनी निवेदनाद्वारे केली आहे. ऊर्जा सचिवांना निलंबित करण्याची मागणी सदर निवेदनामध्ये केलेली नाही.
(४) सद्य:स्थितीत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगावरील अध्यक्ष पद भरलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती करुन ठिंबक सिंचनाचा जास्तीत जास्त वापर वाढविणेबाबत**

**(४८) * ४०३१ श्री.रामराव वडकुते : तारांकित प्रश्न क्रमांक ४६ ला सोमवार दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ठिंबक सिंचनाचे अनुदान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ७५ ते ९० टक्केपर्यंत वाढवणे आवश्यक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) राज्यात शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती करुन ठिंबक सिंचनाचा जास्तीत जास्त वापर वाढविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठिंबक सिंचनाला अनुदान देण्याची योजना आखण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांमध्ये सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील ३२९ कोटीचे ठिंबक अनुदानच थकल्याने या योजनेला खीळ बसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे ठिंबक सिंचनाच्या अनुदानाबाबत रक्कम मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सन २०१३-१४ मध्ये सूक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतक-यांकडून निधी अभावी प्रस्ताव स्विकारण्यात आले नाहीत. तथापि, हे प्रस्ताव स्वीकारुन निधी उपलब्ध करुन देण्याचा

निर्णय शासनाने घेतला आहे. सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यासाठी सन २०१४-२०१५ मध्ये रु.३३२.४३ कोटी रकमेची तरतूद केली असून त्यापैकी रु.२४९.३२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका २० अंतर्गत नाबार्डने सूक्ष्म सिंचनासाठी रुपये ४४६.७३ कोटी एवढा निधी मंजूर केला आहेत. त्यापैकी रुपये १२०.०० कोटी सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी वापरण्यात येणार आहे. उर्वरित रुपये ३२६.७३ कोटी एवढा निधी सन २०१३-१४ मधील प्रलंबित प्रकरणासाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर, जि.जिवती ता.आंध्र व महाराष्ट्र सिमेवरील १४ गांवाचे विशेष बाब म्हणून जमीन मोजणीच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत**

**(४९)** * **२९५५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर, जि.जिवती ता.आंध्र व महाराष्ट्र सिमेवरील १४ गांवाचे विशेष बाब म्हणून जमीन मोजणीचा प्रस्ताव तात्कालीन शासनाने उपसंचालक, भूमि अभिलेख सलग्न जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडून मुख्य सचिव, महसूल यांचेकडे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान सादर करूनही अद्यापही सदर प्रस्तावाला मंजूरी न मिळाल्यामूळे सिमेवरील शेतकरी हक्का पासून वंचित असल्याचे दिनांक १२/१/२०१५ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून सादर करणार आहे काय,

(३) असल्यास, केव्हा,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते (४) तेलगंणा व महाराष्ट्र राज्यांच्या सिमेवरील १४ गावांचा भूमि अभिलेख तयार करण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून जमीन मोजणी करण्याबाबतचा प्रस्ताव जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१४ अन्वये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावामधील त्रुटींची पूर्तता करुन फेरसादर करण्याबाबत जमाबंदी आयुक्त यांना दिनांक १६.१०.२०१४ च्या शासनाच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने पूर्तता करुन प्रस्ताव जमाबंदी आयुक्तांच्या दिनांक २०.०१.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

**गुहागर (जि.रत्नागिरी) एस.टी. आगारातून प्रवाशांना योग्य सेवा मिळत नसल्याबाबत**

**(५०) * ४४५३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) एस.टी. आगारातून प्रवाशांना योग्य सेवा मिळत नसून अधिकारी वर्ग बरेच वेळा जागेवर उपस्थित नसल्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आगारात एकूण ८० एस.टी.बसेस असून त्यात ब-याच गाडया नादुरुस्त असून ३ ते ४ वर्षे होऊनही भंगारातून काढण्यात आलेल्या नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

गुहागर आगारात ७६ नियतांकरीता ७८ गाडया उपलब्ध असून गेल्या तीन वर्षामध्ये गुहागर आगारातील एकूण २५ गाडया नियमानुसार मुदत संपल्याने निकामी करुन चालनातून काढून टाकण्यात आल्या आहेत. तसेच गेल्या तीन वर्षात गुहागर आगारास ३३ नवीन वाहने देण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या**
**बसेसना टोलमधून वगळण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५१) * ३०८२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमधून वगळण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, या निर्णयाचे स्वरूप काय आहे, व त्यानुषंगाने त्यांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) या प्रस्तावावर अद्यापही निर्णय झाला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय हे खरे आहे. शासनाने दि.०१.०७.२०१४ पासून एकूण ४४ पथकर नाके बंद करण्यात आले आहेत. तसेच दि. ०१.०१.२०१५ पासून मुंबई-पनवेल मार्गावर खारघर येथे नव्याने सुरु झालेल्या पथकर नाक्यावरुन रा.प. महामंडळाच्या बसेसना दि.०३.०१.२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले आहे. तसेच इतर मार्गावरील पथकर रद्द करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ कार्यालयातील कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५२) * ३९२२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजाकरीता निर्माण करण्यात आलेल्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ कार्यालयात किती कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत,

(२) तसेच मंजूर कर्मचारी वर्गापैकी फक्त ३८ कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मर्यादित यासाठी शासन निर्णय दिनांक १२ जून २०१३ अन्वये एकूण १५७ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

(२) सध्या मंजूर पदांपैकी व्यवस्थापकीय संचालक व सहव्यवस्थापकीय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार अल्पसंख्याक विकास विभागातील अनुक्रमे सहसचिव व अवर सचिव यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे.

त्याव्यतिरिक्त महामंडळात कंत्राटी तत्वावर ५० व रोजंदारी तत्वावर १४ कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) महामंडळाने लिपिक-टंकलेखकाची ३३ पदे करार तत्वावर भरण्याकरिता जाहिरात दिली होती. दरम्यान सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांनी सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी जाहिरातीस अनुसरुन भरती प्रक्रिया पूर्ण करावी व याचिकाकर्ते धारण करीत असलेली पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करु नये, असे अंतरिम आदेश दिले आहेत. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजा मच्छीमार बंदराच्या प्रस्तवास मंजूरी मिळण्याबाबत**

**(५३) * ४५८५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील ससून डॉक येथील मासेमारी बंदरात गर्दी होत असल्याने त्या बंदराला पर्याय म्हणून उरण शहराच्या नजीक असलेल्या करंजा गावाजवळ मत्स्यबंदर उभारण्याबाबत सातत्याने मागील १० वर्षापासून मागणी असतानाही सदरहू बंदर उभारण्याच्या संदर्भात शासनाकडून कोणताही निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) अत्याधुनिक करंजा बंदर हे आराखड्यात एल टाईपच्या आकाराचे असून केंद्र व राज्य सरकारच्या ५०-५० टक्के निधीव्दारे ११० कोटींची व ८०० मच्छीमारी नौका एकाचवेळी बंदरात लागू शकतील असे, हे उच्च प्रतीचे करंजा बंदर उभारण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब होत असल्यामुळे करंजा बंदराचा कायापालट केवळ कागदावरच राहिलेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, करंजा मच्छीमारी बंदराच्या सदरहू प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारणे कारणे काय आहेत,

(४) करंजा येथील अद्ययावत मच्छीमारी बंदराच्या प्रस्तावास विनाविलंब मंजूरी होवून या बंदराचे विकासाचे काम लवकरात लवकर हाती घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) सदर कामास शासन निर्णय दि.२.९.२०११ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि स्थानिक मच्छिमारांना प्रस्तावित कामामुळे बंदरावर नौका लावण्यास अडचण होत असल्यामुळे सदर काम सुरु करण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सदर काम सुरु करतेवेळी भूस्तरात वाळू मिश्रित माती ऐवजी जीर्ण खडक आढळून आल्यामुळे सदर खडक फोडण्याचे काम मूळ कामामध्ये समाविष्ट करुन सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माळशिरस (जि.सोलापुर) तालुक्यात पीक योजना सुरू करण्याबाबत**

**(५४) * ३२२४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापुर) तालुक्यातील शेती महामंडळाने सन २००८ पासून पीक योजना बंद असल्यामुळे सदाशिवनगर व शिवपुरी आदी ऊस मळ्याअंतर्गत काम करणारे अनेक शेतमजूर बेरोजगार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या बंद करण्यात आलेली पीक योजना सुरू करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची पिक योजना सन २००८ पासून बंद करण्यात आली असली तरी, महामंडळाच्या कायम कामगारांना सेवेत ठेवण्यात आले असून त्यांना नियमितपणे दरमहा पगार देण्यात येत आहे. पीक योजनेच्या कामांनुसार तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेण्यात येत असलेले नैमित्तिक कामगार महामंडळाचे कर्मचारी नाहीत.
(२) पीक योजना तोटयात जात असल्यामुळे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे ती पुन्हा सुरु करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी पथकाच्या नेमणुकीबाबत**

**(५५) * २७९२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातील वक्फ मालमत्तावरील झालेले अतिक्रमणे हटविण्यासाठी तसेच करण्यात आलेल्या अनियमितता दुर करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक जिल्ह्यात अतिक्रमण विरोधी पथकाची स्थापन करण्याबाबतची घोषणा मा.अल्पसंख्याक मंत्री यांनी सन २०१४-१५ दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा पथकांची निर्मितीवरून अतिक्रमणे हटविणे तसेच वक्फ मालमत्तेच्या हिताचे निर्णय घेण्याबाबत प्रत्यक्षात कार्यवाही सुरूवात करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, किती मुदतीत पथकाची स्थापना व कार्यवाही करण्यात येणार आहे
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही, तथापि वक्फ मालमत्तांवरील अतिक्रमणे हटविण्याच्या दृष्टिने वक्फ अधिनियम १९९५, मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याच्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे शिली नेमाणे (ता.खामगाव, जि.बुलढाणा) या पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करणेबाबत**

**(५६) * ५७०३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००५-२००६ मध्ये अतिवृष्टीमुळे मौजे शिली नेमाणे (ता.खामगाव, जि.बुलढाणा) या गावांचे पुर्नवसन करण्याचे आश्वासन तत्कालीन पुर्नवसन राज्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पुरामुळे बाधीत झालेल्या गावांचे पुनर्वसनाचे सर्वकष धोरण ठरविण्याचे काम अपुर्ण आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) होय.
(३) राज्यातील पुरामुळे बाधीत झालेल्या गावांचे पुनर्वसनाचे सर्वकष धोरण ठरविण्याचे काम शासनस्तरावरुन प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघात (महानंद)**
**होत असलेला कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार**

**(५७) * ४२४९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दूध उत्पादक संघाची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघात (महानंद) कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास प्रश्न क्रमांक १ व २ नुसार या प्रकरणात दोषी असलेले संचालक व प्रशासकिय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणती कारवाई करण्यात आली नसल्यास, होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या, महानंद गोरेगाव (पूर्व) यांचे सन २००९-१० व सन २०१०-११ या कालावधीच्या लेखापरिक्षणामधील आक्षेपांबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दि. ०५/०१/२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.
(२) सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. ०५/०१/२०१५ रोजी चौकशी करण्याचे आदेश निर्गमित केले असून चौकशी सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील वाळू उपशास विरोध असूनही वाळू उपशाचा लिलाव काढल्याबाबत

**(५८) * ४६२८ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील कान्हेगाव ग्रामपंचायतीने गेल्या १५ वर्षापासून वाळू उपशास विरोध केला असतांना प्रशासनाने येथील वाळू उपशाचा लिलाव काढल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक गावांनी वाळू उपशास विरोध करणारे ठराव करुनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच कान्हेगाव येथे वाळू नाही, नदी नाही, पण शेत जमीन असलेल्या भागात वाळूचे लिलाव काढण्याकरिता खोटे प्रमाणपत्र दिले होते, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत तक्रार करुन तसेच यंदा दुष्काळ असूनही सदर ठिकाण लिलाव करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे कान्हेगांव, ता.श्रीरामपूर या वाळूगटाचा सन २००३-२००४ पासून लिलाव झालेला नाही. सदर वाळूगटाच्या सन २०१४-२०१५ च्या लिलावास ग्रामसभेने विरोध केला असता, वाळू/रेती निर्गती धोरणासंबंधी, शासन निर्णय दिनांक १२/०३/२०१३ मधील तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी सदर वाळूगटाचा लिलाव करण्याबाबत गुणवत्तेवर निर्णय घेऊन, लिलाव करण्याची शिफारस केली होती. त्याप्रमाणे मौजे कान्हेगांव वाळूगटाचा लिलाव आयोजित करण्यात आला होता. तथापि सदर वाळूगट लिलावात गेलेला नाही.

(२) अहमदनगर जिल्ह्यातील १९४ वाळूगटांपैकी ९३ वाळूगटांच्या लिलावास ग्रामसभेने अनुकूलता दर्शविली होती. तर १०१ वाळूगटांना ग्रामसभेने प्रतिकूलता दर्शविली होती. ग्रामसभेने प्रतिकूलता दर्शविलेल्या १०१ वाळूगटाच्या अनुषंगाने वाळू/रेती निर्गती धोरणासंबंधी शासन निर्णय दिनांक १२/०३/२०१३ मधील तरतूदीनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी यांनी सदर वाळूगटाचा लिलाव करण्याबाबत गुणवत्तेवर निर्णय घेऊन, सदर १०१ वाळूगटांचे लिलाव करण्याची शिफारस केली आहे.

(३) असे निदर्शनास आले नाही.

(४) मौजे कान्हेगांव येथील नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होऊ नये, याकरीता सदर वाळूगटाचा लिलाव करण्याची शिफारस उप विभागीय अधिकारी श्रीरामपूर यांनी केली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू-तलासरी (जि.पालघर) तालुक्यात बेकायदेशीर डोंगर दऱ्यांचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(५९) * ४६४१ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू-तलासरी (जि.पालघर) तालुक्यात मुंबई-अहमदाबाद मार्गालगत विकासकांकडून लहान-मोठे डोंगर, टेकड्या उद्ध्वस्त करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने आतापर्यंत नियमबाहय काम करित असलेल्या किती विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) डहाणू तालुक्यामध्ये अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, तलासरी तालुक्यात मौजे आच्छाड येथे डिसेंबर २०१४ मध्ये अनधिकृत उत्खननाची बाब निदर्शनास आल्यानुसार संबंधितावर रुपये ११,१२,८००/- इतक्या दंडात्मक रकमेचा आदेश तहसिलदार तलासरी यांनी पारीत केला आहे. संबधिताकडून विहीत कालावधीत दंडाची रक्कम शासनाजमा न केल्याने त्यांच्या जमिनीच्या गाव नमुना नंबर ७/१२ वर इतर हक्कात सदर वसूलपात्र रक्कमेचा बोजा ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एसटी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६०) * ५२५९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात.:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी सेवानिवृत्त होणा-या एस.टी.कर्मचा-यांची संख्या आणि मे, २०१५ चा गर्दीचा हंगाम विचारात घेवून सर्व विभागासाठी चालक (कनिष्ठ) व धुळे विभागाकरीता प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागीर ‘क’ (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) इत्यादीबाबत मंजूर पदे व माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान रिक्त होणा-या जागा इत्यादी विचारात घेवून भरती करण्यासंदर्भात आढावा घेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांवरील भरती करणेसंदर्भातील प्रस्तुत आढावा घेण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने रिक्त पदे भरणेबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) होय.

राज्य परिवहन महामंडळातील सर्वच विभागातील चालक (कनिष्ठ) ७६३० जागा भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यासाठी दि.१६.२.२०१५ रोजी जाहिरात प्रदर्शित करण्यात आली आहे. त्यामध्ये धुळे विभागाकरीता ४१५ चालक (कनिष्ठ) पदामधील जागा आहेत.

धुळे विभागातील प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर “क” (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदामधील रिक्त असलेल्या जागा तसेच मे २०१५ च्या गर्दीच्या हंगामाकरीता कर्मचाऱ्यांची आवश्यकता व डिसेंबर २०१५ ची सेवानिवृत्ती विचारात घेवून भरतीची कार्यवाही अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील झरीजामणी तालुक्यातील गौण खनिज चोरट्यावर कारवाई करण्याबाबत**

**(६१) * ५३९२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील झरीजामणी तालुक्यातील पार्डी शिबला येथे महसूल विभागाच्या आशिर्वादाने कंत्राटदारानी गौण खनिजाच्या विनापरवाना खाणी सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिसरातील अवैध उत्खनन सुरु असताना महसूल प्रशासनाने एकाही गौण खनिज चोरट्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणात जबाबदार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही. झरीजामणी तालुक्यात जानेवारी २०१५ व फेब्रुवारी २०१५ या महिन्यात अवैध गौण खनिज वाहतूकीच्या ८ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करुन, रुपये ३५,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडनेरभैरव (ता.चांदवड) येथील गावात कोरडी गारपीट झाल्याने नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(६२) * ५६९३ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडनेरभैरव (ता.चांदवड) गाव शंभर टक्के द्राक्षे निर्यात करणारे नाशिकचे कॅलिफोर्निया मानले जाते. या गावात झालेली कोरडी गारपीट आणि बचावाची काहीही संधी न मिळाल्याने येथील शेतक-यांच्या ४०० कोटींच्या द्राक्षांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांतील शेतक-यांना दिलासा देण्याबाबत कोणती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) राज्यात नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक आपत्तींमुळे नाशिक सह एकूण ९ जिल्हे बाधीत झालेले होते. त्यातील नुकसानग्रस्त क्षेत्राच्या पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण झालेली असून त्यानुसार शासनाने दिनांक ४/२/२०१५ रोजीच्या आदेशानुसार कोराडवाहू शेतीपिकांना रु. १०,०००/- प्रति हेक्टर, आश्वासीत सिंचनाखालील पिकांना रु. १५,०००/- प्रति हेक्टर व बहुवार्षिक पिकांना (फळबाग) रु. २५,०००/- प्रति हेक्टर अशी मदत जाहीर केलेली आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील वणी येथे लोहमार्गावरुन प्रवासी वाहतूकीसाठी पाठपुरावा करण्याबाबत**

**(६३) * ३४४७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील वणी येथे अनेक वर्षापासून रेल्वे स्टेशन आहे व वणी परिसरातील राजूर, मांजरी, घुग्गूस येथून सन १९८५ पासून कोळसा वाहतूक होते मात्र वर्धा तालुक्यातील मुक्कुटबन हे मोठे गाव असून तेथे रेल्वे प्लॅटफार्म असतांना प्रवासी वाहतूक केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणी तालुक्यात ज्या लोहमार्गाच्या गावांत प्लॅटफॉर्मची उभारणी केली आहे तेथून प्रवासी वाहतूक करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वणी तालुक्यात टाकण्यात आलेल्या लोहमार्गावरुन प्रवासी वाहतूक व्हावी म्हणून पाठपुराव्या दाखल केंद्राकडे आतापर्यंत कोणता पाठपुरावा करण्यात आला आहे,

(५) अद्याप पाठपुरावा केला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय हे खरे आहे, तथापि मुक्कुटबन येथे रेल्वेचे स्थानक नाही, त्यामुळे प्रवासी वाहतूक केली जात नाही.

(२), (३), (४) व (५) रेल्वे प्लॅटफॉर्मची उभारणी करणे, तेथून प्रवासी वाहतूक करणे हा विषय रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारीत असल्याने याबाबत राज्य शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील संत्र्याच्या पिकाला बहार गळती लागण्याने**
**शेतकऱ्यांचे लाखो रुपयांची नुकसान झाल्याबाबत**

**(६४) * ४५१८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ संत्रा पिकाच्या लागवडीखाली एकूण क्षेत्र १ लाख १ हजार ६१५ हेक्टर असून चालू हंगामात पावसाअभावी फळ पिकांना झळ पोहोचल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यासंबंधी संबंधीत यंत्रणेकडून पाहणी करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती फळपिकांना नुकसानीची झळ पोहोचली आहे,

(३) नुकसानग्रस्त शेतीच्या संबंधीत यंत्रणेकडून पाहणीकरून नुकसानीचे पंचनामे तयार करणेत आले आहेत काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन सर्व बाबींची पूर्तता करून मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नागपूर व अमरावती विभागात संत्रा पिकाच्या लागवडीखाली एकूण सुमारे ८२,९४८ हेक्टर क्षेत्र असून याबाबत प्राथमिक पाहणीमध्ये कमी पर्जन्यमान, आवश्यक आर्द्रता, तपमान फरकामुळे मृग व आंबीया बहारावर परिणाम झाल्यामुळे फळ पिकांचे २७,५४१ हे. क्षेत्रात बहार न फुटणे व १५ टक्के फळगळ मुळे नुकसान झाल्याने निदर्शनास आले आहे.

(३) व (४) उपरोक्त परिस्थितीत ५० टक्के पेक्षा कमी पैसेवारी आलेल्या क्षेत्रामध्ये बहुवार्षिक फळपिके वाचविण्यासाठी फळबागांचे पुनरुजिवन/पर्णसंभार व्यवस्थापन अनुदान रु. २०,०००/- प्रती हेक्टर, प्लॅस्टीक आच्छादन अनुदान रु. १६००० प्रती हेक्टर व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन अनुदान रु. १२०० प्रती हेक्टर देण्यात येत आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यांत रेतीघाट, मुरूम, चुनखडी, विटभट्टीसाठी लागणारी माती या गौण खनिजांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली चोरी**

**(६५) * ५६१८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यांत प्रचंड भूसंपदा आणि विपूल खनिज संपदा असल्याने रेतीघाट, मुरुम, चुनखडी, विटभट्टीसाठी लागणारी माती या गौण खनिजांची मोठया प्रमाणावर चोरी होत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गौण खनिजाच्या चोरीला पायबंद घालण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. मात्र यवतमाळ जिल्ह्यात गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आलेली आहेत. सदर पथकांनी सन २०१४-२०१५ मध्ये केलेल्या तपासणीत एकूण १०९८ प्रकरणात रुपये ८९,२२,९७८/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील तेलगाव तिरंगी मार्गावर उच्च दाबाच्या विद्युत वाहकतारांमुळे बोअरवेलाच्या मशिन जळाल्याबाबत**

**(६६) * ३९८० श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यापासून ३० कि.मी. अंतरावर असलेल्या तेलगाव तिरंगी मार्गावर जमिनीपासून केवळ ४० फूट उंचीवरुन अत्युच्च दाबाची टॉवरलाईन टाकण्यात आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या बोअरवेलच्या मशीन जळल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉवरलाईनमुळे बोअरवेलचे होत असलेले नुकसान थांबविण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद जिल्हयात शेतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार बोगस प्रमाणपत्राद्‌वारे केल्याबाबत

**(६७) * ५८५९ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात शेतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करताना जलसंपदा विभागाचे बोगस प्रमाणपत्र जोडून ३२०० जणांनी खरेदी विक्रीचे व्यवहार केल्याचे माहे मे, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) सदर खरेदी विक्री व्यवहारामुळे शासनाचे लाखो रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार जलसंपदा विभागाचे बोगस प्रमाणपत्र लावून खरेदी-विक्री केलेल्यांवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्‌याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे. तथापि ७७३ दस्तऐवजांसोबत जलसंपदा विभागाची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आले आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) दुय्यम निबंधक वैजापूर, जि.औरंगाबाद कार्यालयाच्या तपासणी मध्ये ७७३ दस्तऐवजांसोबत जलसंपदा विभागाची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामधील तरतूदीनंसार कमी भरलेल्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच संबधित दस्तऐवजामधील पक्षकाराविरुध्द पोलीस स्टेशन, वैजापूर येथे फिर्याद दाखल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा, वैनगंगा, उमा, इरई नदीवरील रेतीचे होणारे अवैध उत्खनन

**(६८) * ५१३४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा, वैनगंगा, उमा, इरई नदीवरील रेतीचे अवैध उत्खनन सुरु असल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यात अवैध रेती उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र चंद्रपर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी जिल्हा, उपविभाग व तालूका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर पथकांद्वारे एप्रिल २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत १३७१ प्रकरणात रुपये ६६,०१,१२४/- इतका दंड वसुल करुन, ७३ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच १८५ आरोपीविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ता.खेड, जि.पुणे येथे डोंगर फोडून होत असलेले अवैध उत्खन्न त्वरीत रोखण्याबाबत

**(६९) * ४४५५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, जि.पुणे तालुक्यात उद्योगपतीनी अवैधपणे डोंगर फोडून जमिनीचे सपाटीकरण करण्यात येवून लाखो रुपयांना जागा विकल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अवैद्य उत्खन्न करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व सुरू असलेले अवैद्य उत्खन्न त्वरीत रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरेच्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्याची कंत्राटे देण्याबाबत

**(७०) * ५५४२ ॲड.अनिल परब, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील 'आरे' च्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थ्यांचे उत्पादन करण्याची पूर्ण क्षमता असूनही दुध पुरवठा नाही हे कारण देत खासगी कंपन्यांना दुग्धजन्य पदार्थ उत्पादनांची कंत्राटे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दुग्ध व्यवसाय विकास विभागाने या पदार्थाच्या उत्पादनासाठी दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास ई-निविदा मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील 'आरे' च्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्याची पूर्ण क्षमता असतांनाही यासाठी खाजगी कंपन्यांना विविध दुग्धजन्य पदार्थ उत्पादन करण्याची कंत्राटे देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेतला आहे

(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अतिरिक्त दुधाच्या नियोजनासाठी शासनाचा दूध भुकटी प्रकल्प कार्यान्वित केल्यावरही आवश्यकता निर्माण झाल्याने, दूधाचे दूध भुकटीत रुपांतरण करण्यासाठी दूध भुकटी प्रकल्प भाडे तत्वावर घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे.

(२) होय, शासनाने अतिरिक्त दुधाचे दूध भुकटीत रुपांतरण करण्यासाठी दि. १३.१.२०१५ रोजी ई-निविदा प्रसिध्द केली आहे.

(३) शासनाकडे दूध व दुग्धजन्य पदार्थ उत्पादन करण्याची यंत्रसामुग्री जुनी व कालबाहय झालेली आहे. अकोला येथे पाण्याची तीव्र टंचाई व दुधाची अत्यल्प उपलब्धता तसेच यंत्रसामुग्रीच्या देखभालीवर होणारा खर्च, उदगीर येथील यंत्रसामुग्री ३८ वर्ष जुनी असून, तेथील दूध भुकटी प्रकल्पास अतिरिक्त उच्च दाबाच्या विद्युत पुरवठयामुळे प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविणे अशक्य होणे इत्यादि बाबी लक्षात घेवून, आवश्यकतेप्रमाणे शासनाने ई-निविदाद्वारे न्युनतम देकार प्राप्त झालेल्या निविदाकारास शासनाने भाडेतत्वावर दूध भुकटी निर्मितीसाठी कंत्राट दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतीचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविणेबाबत**

**(७१) * ४९०७ श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे मात्र सदर तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शेतीचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) कृषी विषयक माहिती तंत्रज्ञान इंटरनेट व मोबाईल माध्यमाच्या वापराव्दारे शेतकऱ्यांना पोहचविण्याकरीता क्षेत्रीय कार्यालयांना लॅपटॉप डाटा कार्ड पुरविण्यात आले असून, त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

तसेच एनईजीपी-अे योजनेंतर्गत राज्यातील २१० तालुके व चारही कृषि विद्यापीठ स्तरावर किऑक्सचा (टचस्क्रीन संगणक) पुरवठा करण्यात आलेला असून सदर किऑक्स मशीनवर संकलित केलेली शेतकऱ्यांना पाहता येते व किऑक्सला जोडलेल्या इंटरनेट सुविधामुळे शेतकऱ्यांस बाजारभाव, जागतिक स्तरावरील घडामोडी इत्यादी बाबतची माहिती त्वरीत मिळते.

या व्यतिरिक्त राज्यातील शेतकऱ्यांना एस.एम.एस. सुविधेव्दारे हवामान, बाजारभाव, किड व रोग नियंत्रण इ. बाबतची माहिती देण्यात येते.

कृषि विभागामार्फत टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० ची सुविधा जून २०११ पासून कार्यरत असून त्या हेल्प लाईनव्दारे शेतकऱ्यांना विचारलेली माहितीचे निराकरण तात्काळ व विनामूल्य करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र-तेलंगणाच्या सीमावर्ती भागातील साडेबारा गावांतील गावक-यांना महाराष्ट्राचे नागरिकत्व मिळण्याबाबत**

**(७२) * ३२२६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-तेलंगणाच्या सीमावर्ती भागातील बारा गावांवर आंध्र प्रदेश विभाजनानंतर तेलंगणाने दावा केला परंतू या गावक-यांना महाराष्ट्रात रहायचे असल्याने राज्य शासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन केंद्रातील बळ वापरुन २५ वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न

त्वरीत सोडविण्याबाबतची अपेक्षा नागरीक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारा गावातील गावक-यांना महाराष्ट्रात नागरीकत्व मिळण्याबाबत शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते (४) या संदर्भात नागरिकांचे कोणतेही निवेदन माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास शासनास प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. मात्र तत्कालिन आंध्रप्रदेश शासनाने प्रश्नाधीन गावांवरील मालकीसंदर्भात हैद्राबाद उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मागे घेतलेली असल्याने या गावांवरील महाराष्ट्र शासनाची मालकी अबाधित आहे. सदर गावांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४ पोटकलम (१) नुसार महसूली गावाचा दर्जा देण्याबाबत दिनांक ०४.०३.१९९९ रोजी अधिसुचना निर्गमित केली आहे. सदर गावांतील नागरिकांची नोंद महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा व लोकसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत असल्याने या संदर्भात केंद्रशासनाकडे वेगळा पाठपुरावा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तेथील नागरिकांची नावे महाराष्ट्राच्या जनगणना यादीतही आहेत. सदर गावे महाराष्ट्र शासनाच्या महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत व्यवस्था यांच्या कार्यक्षेत्रात असून राज्यशासनाच्या विविध कल्याणकारी योजना तेथे कार्यरत आहेत.

-----------------

## मराठवाडा कृषि विद्यापीठातील बांधकाम गैरव्यवहार प्रकरणाबाबत

**(७३) * २७९८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठातील कोट्यवधी रूपयांचा बांधकाम गैरव्यवहार तसेच इतर गैरव्यवहार प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद तसेच महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांच्याकडून सन २०१४ दरम्यान प्राप्त झालेल्या अहवालांची छाननी शासन स्तरावरून पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या गैरप्रकारातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, मंजूर संस्था व इतरांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) शासन स्तरावर कार्यवाही चालू असून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचे महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना निदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ता.त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील आदिवासी शेतकऱ्यांना वीज पुरवठा खंडीत न करता नियमित वीज पुरवठा करण्याबाबत**

**(७४) * ४२६९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील आदिवासी शेतकरी बारामाही शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असून त्यांना विद्युत पुरवठा वेळेवर व नियमित होत नसल्यामुळे शेतीसाठी पाणी मिळत नसल्यामुळे पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने आदिवासी शेतकऱ्यांना नियमित वेळेवर वीज पुरवठा होण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आदिवासी शेतकऱ्यांना वीज पुरवठा खंडीत न करता ९.०० ते ५.०० (आठ तास) या वेळेत करण्याकरीता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) व (३) शेती पंपासाठी वीज पुरवठा हा शेतीपंप ग्राहकांसाठी असलेल्या मानकांप्रमाणे करण्यात येतो. विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) एस,टी,बस स्थानकात लहान-मोठया विक्रेत्यांचे अतिक्रमाण हटविण्याबाबत**

**(७५) * ४६४२ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) एस.टी.बस स्थानकात लहान-मोठया विक्रेत्यांनी मोठया प्रमाणावर अतिक्रमण केल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस,टी,डेपो विभागाकडून जव्हार नगरपरिषद यांना कळवूनही अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जव्हार एस.टी.स्थानकामधील विक्रेत्याचे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या जव्हार बसस्थानकात अतिक्रमण झालेले नाही. जव्हार बसस्थानकांत राज्य परिवहन महामंडळाच्या नियमानुसार ३ वाणिज्य आस्थापनांना व २ फिरते परवानाधारकांना अधिकृत परवानगी देण्यात आलेली असून ते सर्व परवानाधारक राज्य परिवहन महामंडळाच्या नियमानुसार कार्यरत आहेत. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुध्द तक्रारी दाखल करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथील नवीन बसस्थानक व अन्य तालुक्यातील बसस्थानकात अस्वच्छता वाढल्याने प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(७६) * ५२६०   डॉ.अपूर्व हिरे :**   सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील नवीन बसस्थानक व अन्य तालुक्यातील बस स्थानकात घाणीचे साम्राज्य पसरल्याने प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून मालेगांव येथील नवीन बसस्थानकाचे स्वरुप अक्षरशः कचरा डेपो सारखे झाल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने तपासणी केली आहे काय,
(३) असल्यास, बसस्थानक परिसरात विशेष स्वच्छता मोहिम राबविणेबाबत शासन कोणती उपाययोजना करीत आहे वा करणार आहे,
(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नोव्हेंबर, २०१४ दरम्यान बसस्थानकाचे बांधकाम सुरु असल्याने तेथील अस्वच्छतेचे प्रमाण वाढले होते. बसस्थानकाच्या बाजूला व्यवसाय करणारे व्यवसायीक केरकचरा बसस्थानकावर आणून टाकतात, त्याचप्रमाणे बाहेरील गटाराचे घाण पाणी बसस्थानकाच्या आवारात येते. याबाबत महानगरपालिका, पोलीस खाते, आरोग्य विभाग, मालेगांव यांना वारंवार कळविण्यात येवूनही त्यांच्याकडून अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही.

(३) बसस्थानकाची स्वच्छता राखण्याकरीता वेळोवेळी रोजंदारीवर सफाई कामगार लावून स्वच्छता करुन घेतली जाते. तसेच मा.मंत्री (परिवहन) यांच्या पुढाकाराने घेतलेल्या स्वच्छता अभियानाच्या मोहिमेनंतर अस्वच्छता कमी झालेली असून विशेष मोहिमेव्दारे स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचे काम देखील करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.